ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

विशेषांक

वर्ष ४३ | अंक २ | पाने ७६ | डिसेंबर २०१५ | मूल्य २० रु.



## "हवामान बदल आणि श्वाश्वतता"

**हवा प्रदूषण, हवामान बदल आणि जनतेचे आरोग्य**
अनुमिता रॉय चौधरी

(फोकस)

**हवामान बदलाचा परिणाम आणि शाश्वत कृषी**
एम. एस. स्वामीनाथन

**हवामानातील बदल आणि महाराष्ट्रातील शेतीचे शाश्वतीकरण**
डॉ. सुरेश मैंद

(विशेष लेख)

**हवामान विषयक वैश्विक करार आणि समानता**
टी. जयरामन

**हवामान बदल आणि शाश्वत विकास**
के. जी. सक्सेना

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४३ ❖ ❖ अंक २ ❖ ❖ डिसेंबर २०१५ ❖ ❖ मूल्य २० रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**

संपादक
**उमेश उजगरे**

उप संपादक
**अभिषेक कुमार**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**

'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.

**जाहिरात दर पत्रक**

| | |
|---|---|
| ब्लॅक अँड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक अँड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| ■ जैवविविधता -धोक्याच्या पातळीवर | डॉ. विनीता आपटे | ५ |
| ■ हवामानातील बदल आणि महाराष्ट्रातील शेतीचे शाश्वतीकरण | डॉ. सुरेश मैंद | ९ |
| ■ हवामान बदलाचा परिणाम आणि शाश्वत कृषी | एम. एस. स्वामीनाथन | १४ |
| ■ हवा प्रदूषण, हवामान बदल आणि जनतेचे आरोग्य | अनुमिता रॉय चौधरी | १७ |
| ■ हवामान बदल, तंत्रज्ञान आणि ऊर्जा शाश्वतता | मालती गोयल | २२ |
| ■ हवामान बदल आणि प्रदुषणाचे सामुहिक परिणाम | डॉ. जे. एस. पाण्डे | २९ |
| ■ चाणक्य आणि पर्यावरण | अतुल साठे | ३४ |
| ■ प्राचीन ज्ञान आजही उपयुक्त | विवा किरमानी | ३७ |
| ■ हवामान विषयक वैश्विक करार आणि समानता (विशेष लेख) | टी. जयरामन | ४० |
| ■ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणविषयक दृष्टीकोन | प्रा. प्रवीण घोडेस्वार | ४४ |
| ■ मानवजातीला वाचवण्याची शेवटची संधी | ॲड. गिरीश राऊत | ४७ |
| ■ हवामान बदल आणि शाश्वत विकास | के. जी. सक्सेना | ४९ |
| ■ ऊर्जा निर्मिती क्षेत्र व हवामानातील बदल | डॉ. पी. एस. कांबळे<br>प्रा. काशिनाथ तनंगे | ५५ |
| ■ सर्वांना जोडणारी, सुरक्षित, गुणवत्तापूर्ण सेवा देणारी भारतीय रेल्वे | सुनील कुमार | ६१ |
| ■ भारतातील हवाई प्रवास: वादळातही उंच उडण्याची ताकद | शिशिर सिन्हा | ७१ |

योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना - २७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणविषयक दृष्टीकोन

प्रा. [illegible]



***बाबासाहेबांना शिक्षणाविषयी कमालीचा आदर, आस्था होती. शिक्षणाची संधी सर्वांना मिळावी असा त्यांचा आग्रह होता. ज्ञान आणि आत्मसन्मान शिक्षणानेच प्राप्त होतो असे त्यांना वाटायचे. मानवाच्या उत्थानासाठी शिक्षण हेच प्रभावी अस्त्र असल्याचे ते सांगत. माणसाचा आत्मसन्मान जपण्यासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, असा त्यांचा ठाम विश्वास होता. शिक्षणाचा प्रसार-प्रचार करण्यासाठी बाबासाहेबांनी 1945 मध्ये पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. पीपल्सच्या मार्फत त्यांनी मुंबईत सिद्धार्थ कॉलेज आणि औरंगाबादला मिलिंद कॉलेजची स्थापना केली.***

अमेरिकेतल्या जुन्या विद्यापीठांपैकी एक प्रख्यात निवासी विद्यापीठ असा न्यूयॉर्कस्थित कोलंबिया विद्यापीठाचा लौकिक आहे. इतर कोणत्याही विद्यापीठांपेक्षा मोठ्या प्रमाणात विदेशी भाषांचा अभ्यास नि संशोधन इथे होते. हे या विद्यापीठाचे वैशिष्ट्य. तब्बल ३० लाख ग्रंथसंपदा आणि दुर्मिळ नि अमूल्य अशी हस्तलिखिते इथल्या ग्रंथालयात आहेत. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या संस्थानाच्या वतीने १९१३ मध्ये बाबासाहेबांनी या सुविख्यात विद्यापीठात प्रवेश घेतला. या विद्यापीठातून त्यांनी एम. ए. ची पदवी संपादन केली. Administration and finance of New East India Company हा ४२ मुद्रित पृष्ठांचा शोधनिबंध बाबासाहेबांनी १९१५ मध्ये या पदवीसाठी सादर केला. २०१३ या विश्वविख्यात विद्यापीठाला २५० वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने २० जुलै २०१३ रोजी या विद्यापीठाच्या प्रांगणात जगभरातल्या विद्वानांना आमंत्रित करून दिमाखदार सोहळा आयोजित करण्यात आला होता. बाबासाहेबांनी भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र बनविण्यास राज्यघटनेद्वारे सर्व भारतीयांना हक्क मिळवून दिला आहे. या अलौकिक कार्याची दखल म्हणून कोलम्बिया विद्यापीठाने आपल्या द्विशतकसांवत्सरिक महोत्सवात बाबासाहेबांना 'डॉक्टर ऑफ लॉज' या उपाधीने गौरव केला. या जगप्रसिद्ध विद्यापीठाला २५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने विद्यापीठात शिकलेल्या १०० बुद्धिमान विद्यार्थ्यांची यादी जाहीर केली. यात सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांचा मान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना देण्यात आला! भारतीयांसाठी ही एक विलक्षण आणि अभिमानास्पद घटना म्हणावी लागेल. बाबासाहेबांप्रती असलेल्या आदरापोटी कोलम्बिया विद्यापीठाच्या मुख्य प्रवेश द्वाराजवळ त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला आहे. "डॉ. बाबासाहेबांसारखा नेता आमच्या देशात जन्माला आला असता तर आम्ही त्याला सूर्य संबोधले असते", असे गौरोद्गार पुतळ्याचे अनावरण करताना राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी काढले. कोलम्बिया विद्यापीठाच्या आजवरच्या सर्वाधिक बुद्धिमान विद्यार्थी म्हणून